जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

28 FEB 2021 सकाळ

# मातृभाषेशी नाळ तुटता कामा नये

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : 'दमसास'च्या पुरस्कारांचे वितरण

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २७ : मराठी ही केवळ भाषा नाही, तर आपली संस्कृती आहे. आपली मुले इंग्रजी माध्यमात शिकत असली तरी त्यांची मराठीशी नाळ तुटता कामा नये, याची खबरदारी पालकांनी घेतली पाहिजे, असे स्पष्ट मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेतर्फे आज झालेल्या ग्रंथ पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "वाचन संस्कृती कमी होत चालल्याची चर्चा होत असली तरी सध्याची नवी पिढी मोठ्या प्रमाणात साहित्यनिर्मिती करत आहे. शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालयात कोणत्या प्रकारचे साहित्य असावे, याची शिफारस अभ्यास मंडळाने करावी. त्यानुसार विद्यार्थ्यांपर्यंत दर्जेदार साहित्य पोचवता येईल."




**कोल्हापूर : दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेतर्फे शनिवारी झालेल्या कार्यक्रमात बोलताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. व्यासपीठावर डॉ. विनोद कांबळे, वि. द. कदम, डॉ. विजय चोरमारे, भीमराव धुळूबुळू, गोविंद पाटील, गौरी भोगले, दि. बा. पाटील.**

कार्यक्रमात ज्येष्ठ कवी अशोक भोईटे, साहित्यिक माधव कामत, विजय तेंडूलकर राज्य वाङ्मय पुरस्कारप्राप्त अनुप जत्राटकर, महात्मा ज्योतीराव फुले राज्य वाङ्मय पुरस्कार प्राप्त डॉ. व्ही. एन. शिंदे यांचा विशेष सन्मान झाला.

डॉ. सतीश कुमार पाटील, बजरंग देशमुख, वासंती मेरू, डॉ. अरुण शिंदे, डॉ. सुप्रिया आवारे, चंद्रशेखर कांबळे, वर्षा चौगुले यांना पुरस्काराने सन्मानित केले. बाळासाहेब पाटील, स्वाती शिंदे-पवार, जगजित महावंश, मंगेश मंत्री, विठ्ठल सदामते, लवकुमार मुळे, सुनील देसाई, गौतम कांबळे, उमेश सूयवंशी, विश्वास सुतार यांना विशेष पुरस्कार देण्यात आला.

सभेचे अध्यक्ष डॉ. विजय चोरमारे, वि. द. कदम, भीमराव धुळुबुळू , गौरी भोगले, दि. बा. पाटील उपस्थित होते. डॉ. विनोद कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यवाह गोविंद पाटील यांनी आभार मानले.

2 8 FEB 2021

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# मराठीचा गौरव घराघरांतून केला जावा

## डॉ. डी. टी. शिर्के : दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेतर्फे ग्रंथ पुरस्कार वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मराठी ही केवळ भाषा नाही, तर आपले साहित्य आणि संस्कृती आहे, तिला सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवायचे असेल, तिचा गौरव करायचा असेल, तर त्याची सुरुवात घराघरांतून व्हायला हवी. भलेही विद्यार्थी इंग्रजी माध्यमात शिकत असेल; पण त्याची या साहित्यातील विपुल संपदेशी असलेली नाळ तुटता कामा नये, यासाठी पालकांनी प्रयत्न करावेत, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी व्यक्त केले.




दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या साहित्य पुरस्कार वितरण समारंभात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. विनोद कांबळे, वि. द. कदम, डॉ. विजय चोरमारे, भीमराव धुळुबुळू, गोविंद पाटील उपस्थित होते.

दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या वतीने शनिवारी झालेल्या ग्रंथ पुरस्कार प्रदान समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी सभेचे अध्यक्ष डॉ. विजय चोरमारे, वि.द. कदम, भीमराव धुळुबुळू, गौरी भोगले, दि.बा. पाटील आदींची उपस्थिती होती. ज्येष्ठ कवी अशोक भोईटे, साहित्यिक माधव कामत, विजय तेंडुलकर राज्य वाङ्मय पुरस्कारप्राप्त अनुप जत्राटकर, महात्मा ज्योतीराव फुले राज्य वाङ्मय पुरस्कारप्राप्त डॉ. व्ही.एन. शिंदे यांचा विशेष सन्मान केला.

शिर्के म्हणाले, वाचन संस्कृती कमी होत चालल्याची टीका होत असली तरी मला असे वाटत नाही. आजची नवी पिढी मोठ्या प्रमाणात साहित्य निर्मिती करत असून झपाटून लेखन करत आहे. शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालयात कोणत्या प्रकारचे साहित्य असावे, याची शिफारस अभ्यास मंडळाने करावी, असे झाल्यास विद्यार्थ्यांपर्यंत दर्जेदार साहित्य पोहोचवता येईल.

अशोक भोईटे यांनी कविता सादर केली. कार्यक्रमात डॉ. सतीश कुमार पाटील, बजरंग देशमुख, वासंती मेरू, डॉ. अरुण शिंदे, डॉ. सुप्रिया आवारे, चंद्रशेखर कांबळे, वर्षा चौगुले यांना दक्षिण महाराष्ट्र साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बाळासाहेब पाटील, स्वाती शिंदे-पवार, जगजित महावंश, मंगेश मंत्री, विठ्ठल सदामते, लवकुमार मुळे, सुनील देसाई, गौतम कांबळे, उमेश सूर्यवंशी, विश्वास सुतार यांना विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला. विनोद कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यवाह. गोविंद पाटील यांनी आभार मानले.

28 FEB 2021

तरुण भारत

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठी साहित्याशी नाळ जोडली पाहिजे

## कुलगुरु डॉ. शिर्के : 'तरुण भारत'चे प.महाराष्ट्र आवृत्तीचे संपादक मंगेश मंत्री यांना 'दमसा'चा विशेष पुरस्कार

प्रतिनिधी
कोल्हापूर

मराठी ही केवळ भाषा नाही तर आपले साहित्य आणि संस्कृती आहे, तिला सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवायची असेल, त्याची सुरुवात घराघरातून झाली पाहिजे. विद्यार्थी इंग्रजी माध्यमात शिकले तरी मराठी साहित्यात्याबरोबरची त्यांची नाळ तुटता कामा नये. त्यासाठी पालकांनी प्रयत्न करावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या वतीने झालेल्या ग्रंथ पुरस्कार वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. 'तरुण भारत'चे पश्चिम महाराष्ट्र आवृत्तीचे संपादक मंगेश मंत्री लिखित 'त्यांचे जिणे' या पुस्तकाला विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजय चोरमारे होते.

कुलगुरू डॉ. शिर्के पुढे म्हणाले, वाचन संस्कृती कमी होत नसून नवीन लेखक, कवी तयार होत आहेत. नवी पिढी विविध विषयांवर लेखन करून नवनवीन गोष्ट समाजासमोर आणत आहे. ही विशेष बाब आहे. शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालयात कोणत्या प्रकारचे साहित्य असावे याची शिफारस अभ्यास मंडळाने करावी असे झाल्यास विद्यार्थ्यांपर्यंत दर्जेदार साहित्य पोहोचवता येईल.




**कोल्हापूर : दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या वतीने आयोजित ग्रंथ पुरस्कार वितरण सोहळ्यात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विशेष पुरस्कार स्वीकारताना 'तरुण भारत'चे प. महाराष्ट्र आवृतीचे संपादक मंगेश मंत्री. सोबत वि. द. कदम, विजय चोरमारे, भीमराव धुळुबुळू, गोविंद पाटील, गौरी भोगले, दि. बा. पाटील आदी**

ज्येष्ठ कवी अशोक भोईटे, साहित्यिक माधव कामत, विजय तेंडूलकर राज्य वाङ्मय पुरस्कार प्राप्त अनुप जत्राटकर, महात्मा ज्योतीराव फुले राज्य वाङ्मय पुरस्कार प्राप्त डॉ. व्ही. एन. शिंदे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच डॉ. सतीश कुमार पाटील, बजरंग देशमुख, वासंती मेरु, डॉ. अरुण शिंदे, डॉ. सुप्रिया आवारे, चंद्रशेखर कांबळे, वर्षा चौगुले यांना दक्षिण महाराष्ट्र साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बाळासाहेब पाटील, स्वाती शिंदे-पवार, जगजित महावंश, विठ्ठल सदामते, लवकुमार मुळे, सुनील देसाई, गौतम कांबळे, उमेश सूर्यवंशी, विश्वास सुतार यांना विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला. विनोद कांबळे यांनी सुत्रसंचालन केले. कार्यवाह गोविंद पाटील यांनी आभार मानले. यावेळी वि. द. कदम, भीमराव धुळुबुळू, गोविंद पाटील, गौरी भोगले, दि. बा. पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 FEB 2021
सकाळ

# दोन्ही पद्धतीने परीक्षा होणार : उदय सामंत


उदय सामंत

मुंबई, ता. २७ : राज्यातील विद्यापिठे आणि त्याअंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांतील पदवी, पदव्युत्तर आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन या दोन्ही पद्धतीने घेतल्या जातील, अशी माहिती शनिवारी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली. वाढत्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या समस्या लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यार्थी आता स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन पर्याय निवडतील, त्यासाठी त्यांना ही मुभा देण्यात आली आहे, असेही सामंत यांनी सांगितले.

कोरोनामुळे राज्यातील विद्यापिठे आणि त्याअंतर्गत असलेल्या महाविद्यालयांमध्ये पदवी, पदव्युत्तरच्या प्रथम वर्षाचे प्रवेश उशिराने झाले आहेत. अनेक महाविद्यालयांत पदवीच्या प्रथम वर्षाच्या शिकवण्याही नुकत्याच सुरू झाल्या आहेत. त्यामुळे प्रथम वर्षाच्या परीक्षा उशिराने घेतल्या जातील आणि त्यासाठीचे नियोजन राज्यातील संबंधित विद्यापिठांकडून केले जाईल.

द्वितीय आणि अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम अद्यापही ऑनलाइन पद्धतीने सुरू आहे. या वर्गाच्या परीक्षाही वेळेतच घेतल्या जातील. त्यासाठी राज्यातील सर्व विद्यापीठांकडून आढावा घेतला जात आहे, अशी माहितीही सामंत यांनी दिली. राज्यात पुन्हा कोरोनाने डोके वर काढल्याने पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मागील वर्षाप्रमाणे यंदाही या परीक्षा ऑनलाइन आणि इतर विविध पर्याय देऊन घेतल्या जाव्यात, अशी मागणी विविध विद्यार्थी संघटनेकडून केली जात आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 FEB 2021
पुढारी

# तंत्रशिक्षण परीक्षेसाठी दोन्ही पर्याय उपलब्ध

रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा

यंदा उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाच्या परीक्षा ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतींनी घेतल्या जाणार आहेत. विद्यापीठाकडून हे दोन्ही पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. हे दोन्ही पर्याय ऐच्छिक असल्यामुळे परीक्षा ऑनलाईन द्यायची की ऑफलाईन, याचा निर्णय आता विद्यार्थ्यांनी घ्यायचा आहे, असेही ते म्हणाले.

28 FEB 2021


जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# प्रगतीची द्वारे खुली करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन आवश्यक

## डॉ. व्ही. एन. शिंदे : दै. 'पुढारी' प्रयोग सोशल फाऊंडेशन व विवेकानंद महाविद्यालयाचा उपक्रम

**राष्ट्रीय विज्ञान व मराठी राजभाषा दिन विशेष**



कोल्हापूर : दै. 'पुढारी' प्रयोग सोशल फाऊंडेशन व विवेकानंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'विज्ञानयुग व मराठी साहित्य' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. व्ही. एन. शिंदे. सोबत प्राचार्य आर. आर. कुंभार, डॉ. एस. डी. शिर्के, डॉ. मिलिंद कारंजकर. (छाया : नाज ट्रेनर)

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विज्ञानाने जगाला प्रगतीची द्वारे खुली केली आहेत. विविध प्रकारच्या संशोधनातून प्रत्येक क्षेत्राचे आयाम बदलत आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रगतिपथावर असणाऱ्या राज्याने जगभरातील वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अंगीकार करणे गरजेचे आहे. त्यासाठी मराठीतील विज्ञान साहित्य विकसित होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

दै. 'पुढारी' संचलित प्रयोग सोशल फाऊंडेशन व विवेकानंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'विज्ञानयुग व मराठी साहित्य' या विषयावरील मार्गदर्शन सत्रामध्ये ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य आर. आर. कुंभार होते.

डॉ. शिंदे म्हणाले, इतर भाषांच्या तुलनेत मराठीमध्ये विज्ञानाशी निगडित साहित्याची कमतरता आहे. संशोधक, लेखक यांनी यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. अन्य भाषांमध्ये उपलब्ध असलेली विज्ञानविषयक माहिती मराठी भाषेत अनुवादित करण्यासाठी सार्वत्रिक प्रयत्न महत्त्वाचे आहेत. विज्ञान विषयाची मांडणी सोप्या स्वरूपात करून आपण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवू शकतो. त्यासाठी शाळा व महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन भावी पिढीला नक्कीच मार्गदर्शक ठरेल. सोशल मीडियाचा वापर ज्ञानवृद्धीसाठी व्हावा, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. मिलिंद कारंजकर यांनी प्रास्ताविक तर डॉ. एस. डी. शिर्के यांनी आभार मानले. विद्यार्थिनी अनिसा नदाफ हिने सूत्रसंचालन केले. यावेळी प्रा. एस. पी. साळुंखे, प्रा. स्वरूपा पवार, प्रा. रुचिता शिंदे तसेच महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी

# माध्यमांचा चिकित्सक वापर व्हावा

## डॉ. सुनीलकुमार लवटे यांचे प्रतिपादन



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे आयोजित सचिन वायकुळे लिखित 'पत्रकारिता शोध आणि बोध' ग्रंथ प्रकाशन समारंभात बोलताना डॉ. सुनीलकुमार लवटे. शेजारी भाग्यश्री कासोटे, सम्राट फडणीस, विनायक औंधकर, सचिन वायकुळे, डॉ. शिवाजी जाधव. (छाया : पप्पू अत्तार)**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

माध्यमांचा विस्तार झपाट्याने होत असला तरी प्रत्येकाने माध्यमांचा वापर चिकित्सक पद्धतीने केला पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव अध्यासनातर्फे पत्रकार सचिन वायकुळे लिखित 'पत्रकारिता शोध आणि बोध' ग्रंथ प्रकाशन समारंभात ते बोलत होते. याप्रसंगी महापालिका उपायुक्त विनायक औंधकर, भाग्यश्री कासोटे यांची प्रमुख उपस्थिती होती. पत्रकार सम्राट फडणीस यांनी मार्गदर्शन केले. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. यावेळी सांगली महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. रवींद्र ताटे, मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, पत्रकारिता विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. श्रीहरी देशपांडे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. सुमेधा साळुंखे उपस्थित होते.